महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **जाहिरात सुधारणा क्र.१/२५-०८-२०२२**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील पदभरती करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

**“९.१२ दि.०१/०३/२०२० ते १७/१२/२०२१ या कालावधीत ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे अशा उमेदवारांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर “एक वेळची विशेष बाब” म्हणून परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येईल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या १२, दि.१७/१२/२०२१)**

सदर सवलतीचा लाभ घेण्यास इच्छूक उमेदवारांनी त्यांचा UserID / Application No. व जन्मतारखेच्या पुराव्याची प्रत (PDF format) dvethelpdesk२०२२@gmail.com या ई-मेलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पाठवावी. उमेदवाराने सादर केलेल्या जन्मतारखेच्या पुराव्यावरुन उमेदवार “एक वेळची विशेष बाब” म्हणून संधी मिळण्यास पात्र आहे अथवा नाही याची खातरजमा करुन तद्नंतर उमेदवारास dvethelpdesk२०२२@gmail.com यांचेद्वारे कळविण्यात येईल. “एक वेळची विशेष बाब” म्हणून संधी देत असल्याबाबत dvethelpdesk२०२२@gmail.com यांचेकडून ई-मेलद्वारे सूचना प्राप्त झाल्यास ऑनलाईन अर्ज भरण्याची उर्वरित संपूर्ण कार्यवाही व सामायिक परीक्षा शुल्क अदा करण्याची कार्यवाही ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याकरिता कोणताही वाढीव कालावधी मिळणार नाही. तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.